**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-एमआयएस-4716/प्र.क्र.22/एसएम-2
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय, मुंबई-32
दिनांकः- 21.4.2016

**प्रति,**

1) शिक्षण संचालक(प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य,पुणे
२) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**विषयः-** सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याबाबत
भैरवनाथ शिक्षण संस्था, बाणेर, पुणे संचलित आदित्य इंग्लिश मेडियम स्कूल, बाणेर, पुणे

**संदर्भ :-** १) विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे यांचे पत्र क्रमांक-माध्य-3/15/नाहप्र/पुवि/2015/23346, दिनांक 26.11.2015
२) शासन पत्र,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.हेतूप्र-2012/(106/12)/माशि-5, दिनांक 9.11.2012

श्री.भैरवनाथ शिक्षण संस्था, बाणेर, पुणे संचलित आदित्य इंग्लिश मेडियम स्कूल, बाणेर, पुणे या सीबीएसई मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्न होणाऱ्या इंग्रजी माध्यनाच्या कायम विनाअनुदान तत्वावर शासन आदेश दिनांक 9.11.2012 अन्वये हेतूपत्र दिलेल्या शाळेस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने श्री.भैरवनाथ शिक्षण संस्था, बाणेर, पुणे संचलित आदित्य इंग्लिश मेडियम स्कूल, बाणेर, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहेः-

१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियम) अधिनियम,2012 मधील सर्व तरतुदींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.
२) सदर संस्थेस ज्या ठिकाणी सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी/शाळा सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे त्याठिकाणी संस्था जास्तीत जास्त 18 महिन्याच्या आत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,2009, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 तसेच सी.बी.एस.ई.मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती,अटी यांच्या पुर्ततेसह शाळा इमारत व भौतिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

( रा.ग.गुंजाळ )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रतः-माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित
१) विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे
२) शिक्षणाधिकारी(प्राथमिक/माध्यमिक),जिल्हा परिषद,पुणे
३) अध्यक्ष/सचिव, श्री.भैरवनाथ शिक्षण संस्था, बाणेर, पुणे
४) निवड नस्ती एसएम-2.

Scanned with OKEN Scanner